**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि बेल्जियमचे प्रधानमंत्री बार्ट डी वेव्हर यांच्यात द्विपक्षीय चर्चा

- नेपाळमधल्या महापुरात मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या १ हजार २५० वर, ४ हजारापेक्षा जास्त जण अद्याप बेपत्ता

- आर्थिक फसवणूक आणि अमली पदार्थांसंदर्भातल्या प्रकरणांत ईडीचे आजही देशभरात छापे

**आणि**

- भारताच्या किदांबी श्रीकांतचा चायना मास्टर्स सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि बेल्जियमचे प्रधानमंत्री बार्ट डी वेव्हर यांच्यात आज नवी दिल्ली इथं द्विपक्षीय चर्चा झाली. दोन्ही देशांमधले द्विपक्षीय संबंध, तसंच परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर यावेळी चर्चा झाली. चर्चेनंतर विविध क्षेत्रांमधल्या सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या. बेल्जियमचे प्रधानमंत्री भारताच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर असून, ते काल रात्री नवी दिल्लीत पोहोचले. आज सकाळी त्यांनी राजघाट इथं भेट दिली आणि महात्मा गांधी यांना आदरांजली वाहिली. गेल्या वर्षी फेब्रुवारीमध्ये पदभार स्वीकारल्यानंतर त्यांचा हा पहिलाच भारत दौरा आहे. त्यांच्या या भेटीमुळे भारत-बेल्जियम भागीदारी अधिक दृढ होईल, तसंच व्यापार, गुंतवणूक, संरक्षण आणि सुरक्षा तसंच नवीकरणीय ऊर्जा यासारख्या परस्पर हिताच्या क्षेत्रांमधलं सहकार्य वृद्धिंगत होईल, अशी अपेक्षा आहे.

**<><><><>**

जागतिक अस्थिरतेच्या काळातही भारत ही जगातली सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था ठरल्याचं अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. सीतारामन सध्या अमेरिकेच्या दौऱ्यावर असून, त्या काल 'बँक ऑफ अमेरिका'च्या सहकार्याने भारताच्या वाणिज्य दूतावासाने आयोजित केलेल्या गोलमेज परिषदेला संबोधित करत होत्या. भारताच्या सुधारणा केंदित विकासाचा प्रवास उलगडताना त्यांनी २०२६-२७ च्या पहिल्या तिमाहीतील देशाचा आर्थिक विकासदर ७ पूर्णांक ८ दशांश टक्के राहिल्याचं तसंच देशात गुंतवणुकीचं वातावरण सकारात्मक राहिल्याचं नमूद केलं.

**<><><><>**

EOS-05 हा भूनिरीक्षण उपग्रह उद्या प्रक्षेपित केला जाईल, अशी माहिती भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे अध्यक्ष व्ही. नारायणन यांनी दिली आहे. श्रीहरिकोटा इथल्या सतीश धवन अंतराळ केंद्रातून उद्या पहाटे २ वाजून ५५ मिनिटांनी GSLV-F17 या रॉकेटवरून या उपग्रहाचं प्रक्षेपण होईल. पृथ्वीला स्वतःभोवती एक प्रदक्षिणा पूर्ण करायला जितका वेळ लागतो, तेवढ्याच वेळात हा उपग्रह पृथ्वीभोवती एक प्रदक्षिणा पूर्ण करेल, अशा कक्षेत त्याची स्थापना केली जाईल. या उपग्रहामुळे भूनिरीक्षणाची आपली क्षमता वाढेल, असा विश्वास नारायणन यांनी व्यक्त केला.

**<><><><>**

नेपाळमधल्या महापुरात मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या १ हजार  २५० वर पोहोचली असून, ४ हजार ८०० पेक्षा जास्त जण अद्यापही बेपत्ता आहेत. बचाव पथकं भोटेकोशी नदी जवळच्या बोगद्यांमध्ये आणि भूमिगत वीजनिर्मिती केंद्रांमध्ये अडकलेल्या लोकांचा शोध घेत आहेत. बेपत्ता असलेल्यांमध्ये ५८३ परदेशी नागरिकांचा समावेश आहे. नेपाळचं लष्कर, आणि सुरक्षा दलांच्या संयुक्त पथकांनी

आतापर्यंत ११ हजार ९९३ जणांची सुटका केली आहे. या आपत्तीचा हवामान बदलाशी असलेला संबंध आंतरराष्ट्रीय समुदायासमोर ठामपणे मांडण्याची गरज नेपाळचे प्रधानमंत्री बालेन्द्र शाह यांनी व्यक्त केली आहे. या आपत्तीची व्याप्ती आणि स्वरूप लक्षात घेता, हिमालयीन प्रदेशात राहणाऱ्या लोकांसमोरच्या हवामान बदलाशी संबंधित धोक्यांनी गंभीर स्वरूप घेतल्याचं नेपाळच्या प्रतिनिधीगृहाला संबोधित करताना त्यांनी सांगितलं.

<><><><><>

एका वीजनिर्मिती कंपनीशी संबंधित २९० कोटी रुपयांच्या बँक फसवणुकीच्या प्रकरणात ईडी अर्थात सक्तवसुली संचालनालयाने कोलकाता इथे ११ ठिकाणी छापे टाकले. झारखंडमध्ये ६६ मेगावॅटचा वीजप्रकल्प उभारण्यासाठी संबंधित कंपनीने बँकांकडून कर्ज घेतलं होतं. मात्र, ही रक्कम कंपनीने आपल्या समूहातल्या इतर कंपन्यांकडे वळवली आणि वैयक्तिक कारणांसाठी वापरली, असा आरोप ईडीने केला आहे. राष्ट्रीय कंपनी कायदे लवादासमोर या कंपनीची दिवाळखोरी सिद्ध झाल्यानंतर तिचं अवसायन झालं. या प्रक्रियेत फक्त सात कोटींची वसुली झाली. उर्वरित रकमेच्या वसुलीसाठी हे छापे टाकण्यात आले आहेत. दरम्यान, ईडीने अंमली पदार्थांशी संबंधित विविध प्रकरणांच्या संदर्भात केरळ, कर्नाटक, तमिळनाडू आणि तेलंगणा या राज्यांमधल्या ३० ठिकाणी एकाच वेळी छापे टाकले आहेत. नशामुक्त भारत मोहिमेअंतर्गत ही कारवाई होत आहे.

<><><><><>

चायना मास्टर्स सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेत पुरूषांच्या एकेरी प्रकारात भारताच्या किदांबी श्रीकांतने कॅनडाच्या व्हिक्टर लाईचा २१-१८, २१-१९ असा सरळ गेममध्ये पराभव करत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. श्रीकांतचा पुढचा सामना हाँगकाँगच्या ली चुक यिऊशी होणार आहे. तर महिला एकेरीत तन्वी शर्माला मात्र जपानच्या टोमोका मियाझाकी हिच्याकडून पराभव पत्करावा लागला.

<><><><><>

महिला क्रिकेटमध्ये टी-२० आशिया चषक स्पर्धेत आज भारताचा सामना हाँगकाँगविरुद्ध होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार हा सामना रात्री ८ वाजता सुरू होईल. भारताच्या संघानं गेल्या रविवारी थायलंडच्या संघावर ९४ धावांनी मात केली होती. आज जर भारताने हाँगकाँगचा पराभव केला, तर उपांत्य फेरीतलं भारताचं स्थान निश्चित होईल.

<><><><><>

अहमदाबादमध्ये येत्या ५ ते ९ सप्टेंबर दरम्यान 'ह्युंदाई वर्ल्ड आर्चरी पॅरा सिरीज' ही तीरंदाजी स्पर्धा आयोजित करण्यात आली असून २० देशांचे १०० पेक्षा जास्त खेळाडू यात सहभागी होणार आहेत. भारतात पहिल्यांदाच ही स्पर्धा होणार आहे. स्पर्धेच्या २०२६ च्या मालिकेतला हा तिसरा टप्पा असून, बँकॉक आणि चेक प्रजासत्ताकातल्या नोव्हे मेस्टो इथं यापूर्वीचे टप्पे पार पडले. स्पर्धेचा चौथा म्हणजेच अंतिम टप्पा ऑक्टोबर मध्ये 'चिले' मधल्या 'सँटियागो' इथं होणार आहे. भारतात गुजरात सरकार, 'स्पोर्ट्स अथॉरिटी ऑफ गुजरात' आणि 'स्पोर्ट्स अथॉरिटी ऑफ इंडिया' च्या सहकार्याने 'आर्चरी असोसिएशन ऑफ इंडिया' ने ही स्पर्धा आयोजित केली आहे.

<><><><><>

अमेरिकेत जन्माने नागरिकत्व देण्याच्या नियमावर मर्यादा घालण्याच्या ट्रम्प प्रशासनाच्या आदेशाला अमेरिकेतल्या न्यायालयाने स्थगिती दिली आहे. हा आदेश अमेरिकेच्या संविधानाचं उल्लंघन करत असल्याचा युक्तिवाद स्थलांतरितांच्या हक्कांसाठी लढणाऱ्या कार्यकर्त्यांनी केला होता. त्यानंतर न्यायालयानं हा तात्पुरता दिलासा दिला.

अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयानं ३० जून रोजी दिलेल्या निकालानंतर हा निर्णय घेण्यात आला. ट्रम्प यांचा २०२५ मधला कार्यकारी आदेश संविधानाच्या १४व्या घटनादुरुस्तीचं उल्लंघन करणारा असल्याचं या निकालात म्हटलं होतं. ही घटनादुरुस्ती अमेरिकेच्या भूमीवर जन्मलेल्या मुलांना, त्यांच्या पालकांच्या स्थलांतराच्या दर्जाचा विचार न करता, नागरिकत्वाची हमी देते.

**<><><><><>**

मुंबईत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस आणि कोकणात सावंतवाडी रोड स्थानका दरम्यान धावणाऱ्या नवीन एक्सप्रेस गाडीला मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या हस्ते आज हिरवा झेंडा दाखवण्यात येणार आहे. ही विशेष गाडी दुपारी १२ वाजून ५० मिनिटांनी सीएसएमटी इथून सुटेल आणि दुसऱ्या दिवशी पहाटे २ वाजता सावंतवाडी रोड स्थानकावर पोहोचेल. ही गाडी दादर, ठाणे, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, वीर, खेड, चिपळूण, सावर्डा, आरवली रोड, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, वळिवडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, नांदगाव रोड, कणकवली, सिंधुदुर्ग आणि कुडाळ या ठिकाणी थांबा घेईल.

**<><><><><>**

मद्रास उच्च न्यायालयामध्ये तमिळ भाषेचा मुख्य भाषा म्हणून वापर सुलभ करण्यासाठी केंद्र सरकारने त्वरीत आणि आवश्यक पावले उचलावीत अशी विनंती करणारा ठराव तमिळनाडू विधानसभेमध्ये आज एकमताने मंजूर करण्यात आला. हा ठराव मांडताना मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांनी सांगितलं की, तामिळनाडू अधिकृत भाषा कायदा १९५६ च्या कलम २अन्वये तमिळ ही अधिकृत भाषा म्हणून घोषित करण्यात आली आहे.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशमध्ये आतापर्यंत ३५ जिल्ह्यांना पुराचा फटका बसला असून त्यापैकी २३ जिल्हे सध्या बाधित आहेत. १६ हजार ७८४ जणांना सुरक्षित स्थळी

हलविण्यात आलं आहे. तर पावसासंदर्भातल्या घटनांमध्ये आतापर्यंत तीन जणांचा मृत्यू झाला आहे.

**//<><><><><>//**